फौजदारी जामीन अर्ज क्र. ५६/२०२६

प्रविण ब्रम्हानंद म्हस्के + २

वि.

महाराष्ट्र शासन

(CNR NO. MHBU20-000118-2026)

नि.क्र. १ खाली आदेश

(पारीत दिनांक ११ मार्च २०२६)

०१] प्रस्तुतचा अर्ज; अर्जदारांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८३ अन्वये नियमित जामीन मिळण्याकामी दाखल केला आहे.

०२] अभियोग पक्षाच्या कथेनुसार आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीची मुलगी (मयत रोहीणी प्रविण म्हस्के) हिला सन २०२५ पासून ते दिनांक ०२.०३.२०२६ पावेतो वेळोवेळी चारचाकी वाहन घेण्यासाठी माहेरुन पैसे आणण्याची मागणी करुन शारीरीक व मानसीक त्रास देवुन तिचा छळ केला. आरोपींनी रोहीणी हिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. त्यामुळे रोहीणी प्रविण म्हस्के हीने घरातील टिनपत्राखालील लोखंडी ऍंगलला साडीच्या सहाय्याने गळफास घेवुन आत्महत्या केली. अशा आशयाची फिर्याद पोलीस ठाणे, बिबी येथे दाखल करण्यात आली.

०३] अर्जदारांच्या वतीने विद्वान विधिज्ञ श्री. एस. ए. वाकळे यांनी युक्तिवाद केला की, घटना ही दिनांक ०२.०३.२०२६ रोजी घडली असून फिर्याद १ दिवस उशिरा दिनांक ०३.०३.२०२६ रोजी दाखल करण्यात आली. सर्व आरोपींविरूद्ध मोघम व सामान्य स्वरूपाचे आरोप करण्यात आलेले आहेत. बेकायदेशीर मागणीची रक्कम फिर्यादी मध्ये नमूद नाही. त्यामुळे फिर्याद ही बनावट असल्याचे प्रथम दर्शनी सिद्ध होते. आरोपींकडून काहीही जप्त करणे नाही. अर्जदारांची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. अर्जदार तपासात पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहेत. अर्जदारांना जामीन मिळाल्यास ते जामीन आदेशावरील कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहेत. म्हणून अर्जदारांना जामीन देण्याची विनंती करण्यात आली.

०४] याउलट, विद्वान सरकारी अभियोक्ता श्री. यु. एस. आपटे यांनी तपासी

अंमलदाराच्या म्हणण्यावर जोर देऊन जामीन अर्जावर प्रखर आक्षेप घेतला. त्यांनी युक्तिवाद केला की, अर्जदार हे मयताचे नातेवाईक आहेत. मयताला त्रास देण्यात आल्यामुळे तिने आत्महत्या केली. या गुन्ह्यातील तपास प्राथमिक अवस्थेत आहे. अर्जदारांना जमानत दिल्यास ते तपासात अडथळा निर्माण करू शकतात. तसेच अर्जदार साक्षीदारांना फितूर करू शकतात. म्हणून अर्जदारांचा जामीन अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली.

०५] दोन्ही पक्षाचा युक्तीवादाचे अनुषंगाने केस पेपरची पाहणी केली असता असे दिसून येते की, घटना ही दिनांक ०१.०३.२०२६ ते ०२.०३.२०२६ चे दरम्यान घडली असून फिर्याद दाखल करण्यास एक दिवसाचा विलंब झालेला आहे. फिर्याद पाहता सर्व आरोपींविरूद्ध एकाच प्रकारचे आरोप लावण्यात आलेले आहेत. फिर्यादीत किती रकमेची बेकायदेशीर मागणी करण्यात आली याचा उल्लेख आलेला नाही. म्हणून फिर्याद ही मोघम स्वरूपाची असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते. परिणामी, या सर्व बाबी बचाव पक्षाच्या युक्तिवादाचे समर्थन करतात.

०६] अर्जदारांची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभुमी नाही. अर्जदारांच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण तपास संपलेला आहे. अर्जदारांविरुध्दचे आरोप पाहता त्यांच्याकडून काहीही जप्त करणे नाही. परिणामी तपासाकरीता त्यांच्या अधीक कोठडीची आवश्यकता नाही. अर्जदार हे तपासात पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहेत. अर्जदारांना जामीन मिळाल्यास ते जामीन आदेशावरील कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यांस तयार आहेत. याउलट, अभियोग पक्षाला असलेली भिती आणि साक्षीदारांचे संरक्षण कठोर अटी व शर्ती लादुन केले जावू शकते. म्हणून प्रकरणातील तथ्य व परिस्थीती, गुन्ह्यासाठी असलेली शिक्षेची तरतुद, अर्जदारांचे कृत्य आणि तपासाची स्थिती पाहता, अर्जदारांचा नियमित जमीन अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. करीता पुढील आदेश पारीत करण्यांत येतो.

– आ दे श –

०१] नियमित जामीन अर्ज क्र. ५६/२०२६ मंजूर करण्यात येतो.

०२] अर्जदार क्र. १) **प्रविण ब्रम्हानंद म्हस्के, २) ब्रम्हानंद आनंदा म्हस्के** आणि ३) **प्रदीप ब्रम्हानंद मस्के** यांना पोलीस ठाणे, बिबी येथील अपराध

क्र. ५७/२०२६, कलम १०८, ८५, ८६ सह कलम ३(५) भारतीय न्याय संहिता खालील गुन्ह्यात त्यांचे वैयक्तिक रू. ५०,०००/– **प्रत्येकाचे** बंधपत्र व सदर रकमेचे जामीनदार दिल्यानंतर जामीनावर सोडण्यात यावे.

०३] अर्जदारांनी तपासात सहकार्य करावे आणि दोषारोपपत्र दाखल होईपर्यंत दर सोमवारी तपासी अंमलदारपुढे दुपारी ०२.०० ते ०४.०० वाजेच्या दरम्यान हजर राहावे.

०४] अर्जदारांनी अभियोग पक्षाच्या साक्षीदारांवर दबाव आणू नये किंवा साक्षीदारांना कोणत्याही स्वरूपाचे प्रलोभन दाखवून फितूर करू नये.

०५] अर्जदारांनी दोषारोपपत्र दाखल होईपर्यंत मौजे बोराखेडी बु., ता. सिंदखेड राजा या गावात प्रवेश करू नये.

०६] अर्जदारांनी यापुढे कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा करु नये.

०७] अर्जदारांनी वरील अटी व शर्तींचा भंग केल्यास त्यांची जमानत रद्द करण्यात येईल.

०८] अर्जदारांनी जामीनाची पुर्तता न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, लोणार यांच्याकडे करावी.

(आदेश खुल्या न्यायालयात लिखित व घोषित)

SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR

Digitally signed by SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Date: 2026.03.13 15:28:11 +0530

(सागर कृ मुंगीलवार)
अतिरीक्त सत्र न्यायाधीश
मेहकर

दिनांक – ११.०३.२०२६
ठिकाण – मेहकर

मी, खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे /न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव – श्री. सागर कृ मुंगीलवार,
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मेहकर.

लघुलेखकाचे नांव – शेख इम्रान अब्दुल रऊफ,
लघुलेखक ग्रेड – १, मेहकर

दिनांक – ११.०३.२०२६